# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 17.12.2024** **वार – मंगळवार**

---

**लष्करदिन**

येत्या 15 जानेवारीला साजऱ्या होणाऱ्या लष्कर दिनाचं संचलन यंदा लष्कराच्या पुण्यातील दक्षिण मुख्यालयात होणार आहे. या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर 3 ते 5 जानेवारी या कालावधीत नो युवर आर्मी मेला 2025 चं आयोजन रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबमध्ये होणार आहे. भारतीय लष्कराच्या अभिमानास्पद कामगिरीची ओळख जनसामान्यांना व्हावी या उद्देशानं या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांच्या हस्ते याचं उद्घाटन होणार आहे.

**स्मार्ट इंडिया हॅकेथॉन**

नुकत्याच झालेल्या 'स्मार्ट इंडिया हॅकेथॉन 2024' स्पर्धेत पुण्याच्या दिघी येथील आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी दोन विभागांत प्रथम क्रमांक मिळवला. विद्यार्थ्यांच्या गटानं कल्पकता, बुद्धी आणि नवकल्पनांचं दर्शन घडवत राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत यश मिळवल. स्पर्धेत 'एआयटी'चे 'टीम ब्लॅक सिंडिकेट' आणि 'टीम कार्बन डेटर्स' हे दोन संघ सहभागी झाले होते. दोन्ही संघानी प्रथम क्रमांक पटकावला.

**सवाई**

जगभरातील संगीत रसिकांसाठी पर्वणी असलेला पुण्यातील मानाचा 70वा सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सव उद्यापासून सुरु होत आहे. येत्या 22 डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या संगीत सोहळ्यामध्ये शास्त्रीय संगीतातील अनेक दिग्गज कलाकारांसह 15 नवीन कलाकार प्रथमच या मंचावर आपली कला सादर करणार आहेत.

**शिष्यवृत्ती**

लिला पुनावाला फाउंडेशनने पुण्यासह विविध सहा शहरांतील आर्थिकदृष्ट्या वंचित, पण गुणवान विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती प्रदान केली. यामध्ये अभियांत्रिकी, परिचारिका आणि विज्ञान क्षेत्रातली पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणा-या हजारांहून अधिक विद्यार्थीनींचा यात समावेश आहे. याशिवाय, पुणे विभागातील सातवीपासून पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी जवळपास 300 मुलींना शिष्यवृत्ती देण्यात आली.

**मेट्रो**

शिवाजीनगर-हिंजवडी या तिसऱ्या मेट्रो मार्गावरील स्थानकांचं काम सुरू झालं आहे. 23 किलोमीटरच्या या मार्गामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार आहे. सार्वजनिक खासगी भागीदारीतून या मेट्रो मार्गाचं काम होत असून त्याचं संचालनही खाजगी कंपनीकडे असेल. हा संपूर्ण मार्ग उन्नत असून, या मार्गावर 23 स्थानक आहेत.

**उड्डाणपूल**

उड्डाणपूलाच्या कामासाठी पुण्यातला कात्रज चौक सध्या बंद आहे. मात्र या पूलाचे गर्डर टाकण्यासाठी चौकात असलेली एक जागा अजूनही महापालिकेच्या ताब्यात नाही. ही जागा तातडीनं ताब्यात घेण्यासाठी प्रक्रीया करण्याचे आदेश पुणे महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी महापालिकेच्या पथ विभाग आणि भूसंपादन विभागास दिले आहेत. कात्रज- कोंढवा

रस्त्याचे भूसंपादन होत नसल्यामुळे हा प्रकल्प रखडला आहे. अगोदर 84 मीटरचा रस्ता करण्यात येणार होता. मात्र भुसंपादनासाठी लागणारा खर्च वाढत असल्यामुळे सुरुवातीला 50 मीटर रस्ता विकसीत करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनानं घेतला आहे.

**वीजबिल**

वीज बिलाच्या थकबाकीमुळे ज्या ग्राहकांचा वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडित झाला आहे अशा ग्राहकांना मूळ थकबाकीचा एकरकमी किंवा सहा हप्त्यांत भरणा करून पुन्हा वीजजोडणी देण्यासाठी महावितरणनं अभय योजना सुरू केली आहे. पुणे प्रादेशिक विभागातील 23 हजार 779 थकबाकीदार ग्राहकांनी यात सहभाग नोंदवला असून त्यातील 20 हजार 543 वीजग्राहकांनी 30 कोटी 20 लाख रुपयांच्या मूळ थकबाकीचा भरणा केला आहे. कृषी, आणि सार्वजनिक पाणीपुरवठा योजना वगळून उर्वरित लघु आणि उच्चदाब वर्गवारीतील सर्व घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक आणि इतर वीजग्राहकांसाठी ही योजना असून येत्या 31 डिसेंबरपर्यंत ही योजना सुरू राहणार आहे.

**ससून एचपीव्ही लस**

गेल्या काही वर्षांपासून महिलांमध्ये गर्भाशयाच्या कर्करोगाचं प्रमाण वाढत आहे. त्याला प्रतिबंध करण्यासाठी एचपीव्ही लस वापरली जाते, महिलांबरोबरच पुरुषही ही लस घेऊन जननेंद्रियाच्या कर्करोगाला प्रतिबंध करू शकतात. ही एचपीव्ही प्रतिबंधक लस बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत दिली जाणार आहे. ही लसीकरण मोहीम आजपासून सुरु झाली आहे. अशी माहिती ससूनचे अधिष्ठाता डॉक्टर एकनाथ पवार यांनी दिली. सध्या 9 ते 14 वर्षे वयोगटातील व्यक्तींना या लशीचे दोन डोस देण्यात येतात तर 15 ते 26 वयोगटातील व्यक्तींना तीन डोस देण्यात येतात. या लसीकरणासाठी सिरम इन्स्टिट्यूट तीन हजार डोस उपलब्ध करून देणार आहे. असंही एकनाथ पवार यांनी सांगितलं.

**मॅरेथॉन**

महाराष्ट्र ॲथलेटिक संघटनेच्या मान्यतेने पुण्यामध्ये जानेवारीच्या पहिल्या रविवारी फेडरल बँक पुणे मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे. स्पर्धेच्या नाव नोंदणीला आजपासून सुरुवात झाली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज सकाळी कडाक्याची थंडी होती. उद्याही किमान तापमान आठ अंशांच्या आसपास असेल, तसंच सकाळच्या वेळी धुकं पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**